


शनिखालची चिंच
किरण भावसार
साहित्य प्रतिष्ठान



शनिखालची चिंच

लेखक: किरण भावसार
kiran@enzymeindia.com
मो. ७५८८८३३५६२

प्रकाशन: ई-साहित्य प्रतिष्ठान

मुखपृष्ठ, अंतर्गत मांडणी व सजावट : सृजा
अंतर्गत चित्रे: परीश जुमनाके

©लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे व प्रकाशनाचे सर्व हक्क ई-साहित्य प्रतिष्ठानकडे सुरक्षित. या पुस्तकातील कोणत्याही भागाचा कोणत्याही गोष्टीसाठी उपयोग करण्याआधी लेखक व प्रकाशकांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. हे पुस्तक विनामूल्य वितरणासाठी आहे. याची छापील अथवा ई-स्वरूपात विक्री करण्यास सक्त मनाई आहे.

©या पुस्तकातील काही चित्रे गुगलवरून घेतलेली आहेत. त्यांचे अधिकार त्या त्या कलाकाराकडे सुरक्षित आहेत.

संपर्क: ई-साहित्य प्रतिष्ठान,
जी-११०२ ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे,
तीन हात नाका, ठाणे पश्चिम,
४०० ६०४.
मो. ९८६९६७४८२०

वेबसाईट www.esahity.com
ईमेल esahity@gmail.com

# अर्पण पत्रिका

*आयुष्यातल्या आंबटगोड स्मृतींचा गोफ जिच्यामुळे विणता आला त्या शानिखालच्या चिंचेस...*

*तसेच ज्यांच्यामुळे या चिंचेचं एकाकीपण संपून चिंचबनाचं स्वप्न जमिनीत रुजलं त्या मधुकर गिते व सुधीर बर्वे या काळजातल्या मित्रांस...*

*कृतज्ञता पूर्वक.*

*किरण भावसार*

# चिंचेभोवती रेंगाळताना

माणसाच्या बारशाला लावल्या जाणा-या नावाला मागं सारून मिळालेलं गाव जगण्याबरोबर अन जगण्यानंतरही संगत सोबत करत राहतं. गावात गावाबरोबर जगताना आपलं हक्काचं म्हणून त्याचं महत्व फक्त सुखदुःखालाच कळून येतं. पण लेखकाचा मनोधर्म जपणा-या सजग माणसाला पोटापाण्याच्या निमित्ताने जगणाच्या नव्या वाटा धुंडाळताना 'जिथं भरेल दरा, तोच गाव खरा" या उक्तीचा प्रत्यय हरघडी येतो. मुळांवरची माती सांभाळताना नुसतं गावाचं नाव लावून चैन पडत नाही तर हातात आशेची फांदी हिरवी ठेवत, संस्कार आणि संस्कृतीची समृद्ध शिदोरी हाती देत आपल्याला कडेखांदी वाढवणा-या गावाला मनभर होऊ द्यावं लागतं.

जिव्हाळ्याचे धागे जपताना गावाचा गावपणा मनातून हटता हटत नाही. ते आपण आपलं आपल्यासाठी आपलेपणानं काळजात जपलेलं संचित असतं. ते जपताना बापजाद्यांचे कणे कामातून गेलेले असतात. तीच त्यांच्या घामावरची साय. ही साय मनाचा काठ सोडून पानात ऊतू जाते तेव्हा जगाच्या पाठीवरला कोणताही माती आणि माणसाशी नाती जपणारा गाववेडा माणूस क्षणभर हलल्याशिवाय रहात नाही. असा अनुभव क्षणभरच नाही तर सायीच्या सईसोबत नेहमी गावात राहूनही घेता न आलेल्या मला 'शनिखालची चिंच' या हिरव्यागार कलाकृतीने दिला.

नाशिक जिल्ह्यातील वडांगळी... नेहमी वांझ वाहते झाकोळ पाहणारे तहानलेले गाव. बहराच्या दिवसात अंगाखांद्यावर खेळवणारं, जोजवणारं आणि संस्कार रुजवणारं. मनाच्या पाटीवर कोरलं गेलेलं हे गाव मुळावरची माती सांभाळण्यासाठी धडपडणा-या किरणच्या मनात नेहमीच आठवणींची शाळा भरवत राहिलेलं. मात्र गावावर मायेची पाखरण धरणारी 'शनिखालची चिंच' साकारताना त्याची घालमेल अन् त्याची तिच्यामधली हार्दिक गुंतवणूक केवळ त्याची एकट्याची न राहता सर्वांची होते. प्रतीक-प्रतिमांशिवाय साहित्यनिर्मिती पूर्णतया निर्जीव ठरते. माती हेच सृजनाचे मूलस्थान आणि या मातीतच मुळं असलेल्या किरणच्या प्रतिमाही साहजिकच बोलक्या आणि सृजनशील आहेत. गावाला ऊब देणारी ही शनिखालच्या चिंचेची प्रतिमा वाचकाला थेट गावात घेऊन जाते.

*शेतकऱ्याच्या घामाचे आणि श्रमाचे प्रतीक असलेले बैल वाचकाला हळवं करून सोडतात. उद्याच्या उगवतीसाठी आजची टळटळीत दुपार सोसणारे लेखकाचे वडील, त्यांची शिवणाच्या मशीनवरची रात्रंदिवस चाललेली जीवघेणी डोळेफोड, जिवाच्या आकांतानं वाढवलेली पण तरीही संसाराचा भार पेलू न शकणारी मशीनच्या चाकाची गती अशा परिस्थितीत स्वतःच्या सायकलमधलं भाग्यही दिसतं. आणि नानांना सायकलच्या पालखीतून श्रवणश्रद्धेने त्र्यंबकेश्वराला निवृत्तीनाथांच्या समाधी दर्शनाला नेणं वाचकाला वेगळ्याच विश्वात घेऊन जातं*

*मातीत मळल्या मनावर रेखाटलेला गाव किरण पानापानातून सर्वसाक्षी करतात. ते वाचताना मनातून हटता हटत नाही. शेतीमातीत रमलेल्या शेतकरी गावात शेतीची कामं न येणारा कितीही मोठा पंडित असला तरीही तो अडाणीच. मात्र एकदा गावाशी एकरूप झाला की अडाण्याच्या आळीचं भावविश्वही तो समृद्ध करतो अन गाव पुन्हा नव्याने मनात वसत जातं. सण-संस्कृतीशिवाय माणूस आणि गाव रया गेलेल्या मातीप्रमाणे निझर होत जातात. हे असं रया गेलेलं गावपण वडांगळीच्या वाट्याला कधीच आलं नाही म्हणूनच मनाच्या आणि मानाच्या नकाशावर नवरात्र, वडजाईचं देऊळ आणि खेळ सवंगड्यांचा आनंद ठळक दिसतात. वाचकाला लोभस वाटत राहतात. आणि लेखकाच्या पाठोपाठ वाचकही मनानं गावात जाऊन पोहोचतो*

*किरणच्या लेखनातून अधिकच गर्द झालेली गावच्या आठवणींनी गच्च लगडलेली शनिखालची चिंच वाचकाच्या मनाला पाणी सोडल्यावाचून राहणार नाहीत एवढे नक्की. वाचकांना जगताना सोबत करण्यासाठी, माणूसपण राखण्यासाठी किरणच्या हाताला उदंड बळ मिळावं ही श्री चरणी प्रार्थना.*

**- यशवंत पुलाटे**

# थोडं आंबटगोड

माझ्या ललित लेखनाची सुरुवात जिथून झाली तो माझ्या मर्मबंधातली ठेव असलेला शनिखालची चिंच हा लेख. अनेकदा आपण आपल्याच एखाद्या कलाकृतीच्या विलक्षण प्रेमात असतो. माझं ललित लिखाणाच्या क्षेत्रातलं पहिलं पाऊल उमटलं ते या लेखाच्या निमित्तानं.. अन् मग लिहीत गेलो. कविता लेखनाइतक्याच सहजतेने आपल्याला हे साधेल का अशी मनातली भीती या पहिल्याच लेखाने घालवली. गावाकडच्या स्मृती जागवताना मी स्वतः त्यात दंग झालो होतो. मला आनंद देणाऱ्या या मखमली आठवणी त्या जशा आहेत तशा वाचकांपर्यंत त्यांच्या काळजपर्यंत पोचवण्याचा माझा प्रयत्न जरा धाडसाचाच. पण वाचकांची पावती मिळत राहिली अन मला लिहिण्याचं बळ मिळत गेलं. यापूर्वीच्या 'आठवणींची भरता शाळा' या पुस्तकाला मिळालेल्या प्रतिसादाने ललितलेखनाची माझी ऊर्मी वाढत गेली.

या सगळ्याच एकंदर वाटचालीत ई-साहित्य प्रतिष्ठानची लाभलेली साथ, ई-साहित्य परिवाराचं भरभरून लाभलेलं प्रेम आयुष्यभर न विसरण्याजोगं! माझा ठाण्याचा जिवलग मित्र संतोष सोनवणे वीस-बावीस वर्षांनंतर अवचित भेटला अन जादूची छडी हाती द्यावी तसा माझ्यासाठी ई-साहित्यचं व्यासपीठ हवाली करून गेला. आदरणीय किशोर राठी यांनीही पुस्तक प्रकाशनाची ही वाट मला कितीतरी आधी सुचवली होतीच. अन बघता बघता माझं हे तिसरं पुस्तक मी आपल्यापर्यंत घेऊन येऊ शकलो

श्रेयासाठी सगळीकडे धडपड सुरू असताना नामानिराळं राहण्याची कला साधलेले नामकाका, माझ्यासाठी नामदादा, ई-साहित्य परिवारातील सर्व सदस्य. आठवणींची भरता शाळाचे अविस्मरणीय मुखपृष्ठ व रचनाकार अमृता ढगे, चित्रकार सुधीर बर्वे, राहुल पगारे, शनिखालची चिंच साठी अतिशय सुंदर मुखपृष्ठ व रचना साकारणारी संहिता हिस्वनकर, अतिशय नेटकी प्रस्तावना देणारे यशवंत पुलाटे, मुद्रण-मुद्रित शोधनाचे संस्करण करणारे पूर्वा कदम, शरद बोंबले, संपत ढोली, अप्रतिम रेखाटने करून पुस्तकाला जिवंत करणारा चित्रकार परिश जुमनाके, ज्यांच्या नितांतसुंदर लेखनाचा संस्कार माझ्यावर झाला त्या मनीषाताई कुलकर्णी. माझ्या साहित्यिक वाटचालीत माझी सदोदित पाठराखण करणारे कविमित्र विवेक उगलमुगले

विजयकुमार मिठे, रवींद्र मालुंजकर, किरण लोखंडे, ज्यांचा आशीर्वाद सतत नवनिर्मितीची प्रेरणा देत राहतो ते सुमंत काका गुजराथी, माझ्यातला लेखक घडवण्यात मोलाचा वाटा असलेले प्रकाश खुळे, बनू जोशी, पंकज गुजराथी, निलेश मालाणी, आयुष्याच्या सुरुवातीला पत्रकारितेच्या माध्यमातून अनेकविध विषय सुचवत ज्यांनी लिहित केलं प्रत्येक घटनेकडे पाहण्याची वेगळी दृष्टी दिली तसेच या पुस्तकाची पाठराखण केली ते आदरणीय मोहन वैद्य. या सर्वांची कृतज्ञता शब्दात कशी व्यक्त करावी? आवर्जून प्रतिक्रिया कळवून शुभेच्छा, लिहिण्याला बळ देणारे वाचक ही तर माझी कशातही न मोजता येणारी खरी कमाई. वाचकांचा ऋणातून कसा उतराई होऊ?

माझं सर्वस्व असलेले माझे आई वडील, भाऊ, पत्नी दिपाली, सोनू-मोनू ही चिमुरडी पोरं, माझी मायभूमी वडांगळी, तिथली माझी माणसं, हे सारंच माझं संचित. माय मातीची चार बोटं ललाटी लावून माझ्या मनात रुजलेलं हे चिंचेचं झाड आज आपल्या स्वाधीन करतोय. त्याला तुमच्या हृदयात, अंगणात जागा द्या इतकंच.!

किरण भावसार.


शनिखालची
चिंच



गर्भार ऋतूत देहावर गर्द हिरवी लव्हाळी लेऊन उभी राहणारी शनिखालची चिंच तिच्या आंबट चवीसह अजूनही मनात रेंगाळत आहे.. उगवतीकडून गावात शिरल्याबरोबर उजव्या हाताला ही चिंच आपल्याला कवेत घेण्यासाठी उभी असते. चिल्यापिल्यांना पंखाखाली घेऊन बसलेल्या कोंबडीसारखी अख्ख्या गावावर आपल्या मायेची पाखर धरणारी ही चिंच कैक पिढ्यांपासून ऊन-वाऱ्याचा सामना करीत अहोरात्र गावाची पाठराखण करीत आहे. एका टोकाला सतीआई अन् दुसऱ्या टोकाला ही चिंच! खरं तर ही चिंच म्हणजे आमचं मुळपुरुष असणारं आणखी दुसरं ग्रामदैवतच!!

आईनं लाडं लाडं लेकराला मांडीवर घेऊस बसावं तशी छोटय़ाशा शनिमंदिराला कुशीत घेऊन गावाच्या पुर्वेला बस्तान बसवलेली ही चिंच. ऐन बाजारपेठेत असूनही चौकाच्या भरवस्तीत एरव्ही ती अंग चोरुन उभी असते. रोजच्या रगाडय़ात तिचं अस्तित्वही लक्षात न येणारं. दोन हातांच्या कवळीत न मावणारा भरभक्कम बुंधा. त्यावर लटकवलेली पोस्टाची लाल पत्रपेटी अन् 'शनिचौक' अशी अक्षरे असलेला बोर्ड. तिचं हे रुपडं मला खिशाला पेन लावलेल्या रुबाबदार गृहस्थासारखंच वाटतं!

आमचं वडांगळी गाव तसं लवणात वसलेलं. गावाला कुशीत घेऊनच वाहणारी अन् खडांगळी आणि वडांगळी अशी दोन भावंड दोन्ही हाताशी घेऊन चाललेली देवनदी. थोडी वरच्या बाजूला किर्तांगळी अन् पायथ्याशी चोंढी-मेंढी अशी दोन-दोन किलोमीटरच्या अंतरानं वसलेली गावं, सख्ख्या भावंडांसारखी! देवनदीच्या धाग्यात गुंफलेल्या फुलांसारखी.

या कुठल्याही गावाहून वडांगळीला येतांना मात्र चढण उतरुनच यावं लागतं. मग ते पुर्वेकडून मेंढीहून येतांना बेंदाच्या रस्त्यानं येणं असो की, कोमलवाडीकडून पश्चिमेकडून येतांना गावखराचा उतार उतरुन येणं असो. गाव असं खोलात, झाडाझुडपात हरवून गेलेलं. दक्षिण दिशेनं किर्तागळीच्या उतारावरुन येतांना म्हाळोबा-बिरोबाची मंदिरं येईपर्यंत गाव आल्याचं लक्षात येत नाही. तामसवाडीच्या गंगावाटेनं येतांना वडजाई जवळच्या जुन्या पांढरीजवळून जसं जसं पुढे सरकावं तस तसं एकेक घर डोळे मिचकावत पुढे येऊ लागतं.



पुर्वेकडून गावाकडे प्रवेश करतांना शनिखालची चिंच सर्वप्रथम आपल्या डौलदार हातांनी तुमचं स्वागत करते. खरंतर या चिंचेच्या झाडांचही आमच्या गावाबाबतीत एक वैशिष्ट्यच आहे. एकतर ही सगळी झाडं गावाच्या वेशीबाहेर. देवनदीच्या तीरावर तर भली मोठी चिंचेची बागच आहे. या चिंचबनापासून बाजारतळापर्यंत सगळी चिंचेची झाडं हद्द ठरवून घेतल्यासारखी अन् या सगळ्या झाडांची प्रतिनिधी म्हणून ही शनिखालची चिंच वेस ओलांडून प्रवेशद्वारात उभी ठाकलेली. चिंचांनी गावाची अशी पाठराखणं केलेली. आता आतापर्यंत ग्रामपंचायतीने दहनभूमीचे शेड बांधेपर्यंत गावातल्या कोणालाही इहलोक सोडण्यासाठीचा अखेरचा निरोपही नदीकाठावरच्या चिंचेखालीच दिला जायचा. शोकसभा मात्र शनिच्या चिंचेखालीच. रंगनाथ पाटलांनी सर्वप्रथम पाडलेला शोकसभेचा पायंडा आणि त्यांच्या थरथरत्या ओठांनी अनेकांना वाहिलेल्या श्रध्दांजलीची साक्षीदारही चिंचच. खरं वैशिष्ट्य काय तर या चिंचेनंतर गावात पुन्हा दुसरं म्हणून चिंचेचं झाडं नाही!



*पूर्वी खूप झाडं असावीत वडाची. त्यामुळे वडांगळी नाव पडलं असावं कदाचित. आज एखाद दुसरं झाड सोडलं तर सगळे वड काळाच्या उदरात गडप झालेले. या चिंचेनं गावाला अंगाखांद्यावर खेळवलेलं, जोजवलेलं. गावाच्या प्रत्येक सुखदुःखात रममाण झालेल्या या चिंचेच्या सावलीत अनेक उत्सव सजले. गाढवावरुन जावयाची धिंड काढण्याची प्रथा चिंचेच्याच सावलीत जोपासली गेली. तिने घोड़्यावरुन शेवंती चढवायला जाणाऱ्या जावयाला जसं शुभेच्छांचं बळ दिलं तितकीच टवाळी गाढवावर बसवून धुळवड उडवून केली. तिचं निष्पाप मन अन् खिलाडू वृत्ती सासऱ्याच्या कुंडलीतला दहावा ग्रह असणाऱ्या जावईवर्गालाही सन्मानजनकच वाटत राहीली.*

*(एक स्मरण : सुखाच्या वरातीने उजळून जाणारी चिंच एखाद्याला अखेरचा निरोप देतांना पार काळवंडून जायची/ जाते. लक्ष्मणतात्या कुलथे, रावजीबाबा खुळे यांना वाटी लावतांना अथांग जनसागराच्या साक्षीने गदगदून गेलेलं हे झाड आम्ही पाहिलंय)*

*गावातलं पहिलं वाचनालय सुरु झालं. चिंचेखाली वर्तमानपत्रांची पेटी सावलीत ठोकली गेली अन् वृत्तपत्र वाचनात गढून गेली चिंच. पेपर वाचण्यात दंग असणाऱ्या एखाद्या पांढऱ्या टोपीवर नेम धरुन शिटायचा कावळा तेव्हा हसू आवरत नसे चिंचेला. भाऊसाहेब गिताराम सारख्या ढाण्या वाघाचा गावकीचा कारभार पाहिला चिंचेनं अन् रुबाबदार भास्कर पाटलानं केलेला न्यायही. रज्जाक तांबोळ्यातला मांत्रिक अन् बाल-गोपाळांना वेड लावणाऱ्या गेणू तेल्याची जादूही अनुभवली चिंचेनं. आजारी गावावर मनकु मास्तर, गुलाम मास्तर, सैय्यद डॉक्टर अशा सेवाभावी धन्वंतरींकडून होणारे इलाज तिनं पाहिलेत. सायकलवरुन शीळ घालीत आख्या गावाला खुशाली वाटणारा कादरभाई पोस्टमन, सुरेल तालात मंगलाष्टक म्हणणारा रघू ब्राम्हण, पंचक्रोशीचं भविष्य सांगणारा नाना ब्राम्हण, धंद्यात नाव कमवूनही कथा-कीर्तनातच अधिक रमलेले सीताराम शेठ, तीन कोसावरुन गंगेचं पाणी अनवाणी पावलांनी आणून गावातील देवांवर घातल्याशिवाय अन्नाचा घास न घेणारा काशिनाथ रंगारी.. असे किती तरी.. सगळे सगळे चिंचेचे जीव की प्राण.*

यात्रेच्या दिवशी गावातून निरनिराळ्या दैवतांच्या निशाण काठीच्या निघणाऱ्या मिरवणूका म्हणजे मोठा उल्हास! उंच उंच फडकणाऱ्या, डफांच्या तालावर नाचणाऱ्या काठय़ांबरोबर चिंचेचा शेंडाही भारावून हेलावत राही. मिरवणुकीतली धोंडूबाबाची सनई, धनाबाबाचा संबळ, सलीमचा बँड या सगळ्यांच्या ठेक्यावर चिंचेने कैक वेळा ताल धरलेला..



अनेक निवडणुकांचे प्रचाराचे नारळ इथे फुटले. आमचा सुहृद रवी जेव्हा पंचायत समितीच्या निवडणूक रिंगणात उतरला तेव्हा गावाच्या बरोबरीने चिंचही जणू प्रचारात सामील झाली अन् नंतरच्या विजयी सभेला, मिरवणुकीला तर जणू ढोल ताशांच्या गजरात रोमरोमी फुलून नवधर युवती होऊन तिनं थरथरत तालही धरला. परवा ते गोड पोरगं दत्तू खुळ परिस्थितीशी सामना करीत जीपच्या अपघातात गेलं तेव्हा गावकऱ्यांसोबत ओक्साबोक्शी रडली ही चिंच.

पंचवीस तीस वर्षांपूर्वीची गोष्ट असावी. गुण्यागोविंदयानं नांदणाऱ्या गावात जातीय वादातून खटके उडू लागले. तरुण माथी भडकू लागली. दलित पँथर, मराठा महासंघ अशा शाखा स्थापन झाल्या. कुठल्याही कुरापतीला जातीय रंग चढू लागला. आपल्याच लेकरांतील या भाऊबंदकीने ही चिंच हबकूनच गेली. खचली. मनोमन सुन्न झाली. पण कोंडी फुटायचं नावं नाही. मग भगवा अन् निळ्या झेंडय़ांत चढाओढ लागली. कुठकुठला झेंडा अधिक उंच फडकणार याची अहमहमिका सुरु. या दोन्ही झेंडय़ांतील चढाओढही याच चिंचेने अनुभवली. तिच्या शेंडय़ावर झेंडे फडकले दोन्ही उंच उंच.मात्र चिंचेचा शेंडा तेव्हापासून जो झुकला तो झुकलाच. नंतर कैक दिवस तिला फळभारही आला नाही. वडलांच्या हयातीत भावाभावांत वाद होऊन भरल्या घराचे वासे फिरावेत.. त्या बापाच्या झुकलेल्या माथ्यासारखी भासत राहिली चिंच.



पोळ्याचे बैल मिरवतात चिंचेखालून, पाडव्याला वीरांची मिरवणूकही चिंचेला वळसा घालून जाते. गुढीपाडव्याला पुंजातात्यांच्या मोठ्या महादेवाची कावड चिंचेच्या पायावर पाणी घालूनच पुढे सरकते. 1 मे ला पास होणाऱ्या मुलांसाठी पेढे पुढय़ात घेऊन बसते चिंच. कलावैभव, सरस्वती नाट्य मंडळाची तसेच दिग्विजय परिवाराची चिंच गावाशी एकरुप होऊन गेलेली. गावाच्या सुखदुःखात समरस झालेली. चिंचेखालीच ज्यांच्या पिढय़ानपिढ्या वाढल्या त्या चुंबळे परिवाराची सून नंदाबाई गावाची पहिली महिला सरपंच झाली. तेव्हा चिंचेलाही सरपंचाच्या खुर्चीत जाऊन बसल्यासारखं वाटलं. कित्येक दिवस ती सरपंचाच्या थाटातच वावरत होती.

गावात हरीनाम सप्ताह सुरु झाला की हे अवघं झाड विठ्ठलमय होऊन जायचं. काकडारती, ज्ञानेश्वरी पारायण, हरीपाठ, प्रवचन, कीर्तनाची जेव्हा लयलूट व्हायची तेव्हा एकाजागी अडकून पडल्याचं किती दुःख व्हायचं चिंचेला. आपल्या पानापानांचे कान करुन तिचं सगळं चित्त विठ्ठल मंदिराकडे धाव घेई. आपल्या शेंडय़ाची मान उंच उंच करुन विठ्ठल मंदिराच्या गाभाऱ्यात ती डोकावून पाही. शेजारच्या दत्त मंदिरात सकाळी सकाळी पूजेला आलेल्या कांता कासाराला पाहून तर तिला विठ्ठलच भेटल्याचा आनंद होई. विठ्ठल मंदिराचा पुजारीही तिच्यासाठी काळ्या टोपीतला विठ्ठलच बनून येई. संसारात राहूनही परमार्थातच रममाण झालेल्या निवृत्तीबाबाच्या हरीपाठाचे स्वर ती कानात साठवून घेई, त्यांच्या तोंडून ज्ञानेश्वरी ऐके अन् संथाही घेत असे गीतेची कधी कधी. भास्कर मिस्तरीची रसाळ आवाजातली पोथीही तिने तल्लीन होऊन ऐकलेली.

गुरु गंगाधर स्वामींच्या मठाचा झालेला जीर्णोद्धार, पंचाचार्याच्या पालख्या, पंडिताराध्य शिवाचार्य महाराजांचा पट्टाभिषेक सोहळा, आडव्या पालखीची मिरवणूक, तिनं सारं सारं आपल्या मनात साठवून ठेवलेलं. कुठलीही दिंडी, पालखी मिरवणूक असो, चाणखनबाबा, दावल मलिक, मिरावली बाबा, मोठेबाबाचा संदल असो, मनाने चिंच प्रत्येक मिरवणूकीत सामील व्हायची.

दिवसभर गावात भणभणत फिरणाऱ्या भणंग वेडय़ांनाही रात्री आपल्या कुशीत घेऊन जोजवायची चिंच. गाव भलेही दोन वाड्यांत.. खालचा वाडा अन् वरच्या वाड्यात वाटलेलं. पण चिंचेनं मात्र सर्वांवर भरभरुन केवळ प्रेमच केलं. 'ऐसी कळवळ्याची जाती, करी लाभाविण प्रिती' हे तिच्या बाबतीत अगदी तंतोतंत खरं!

गणपतीच्या ओटय़ावर रंगणारी नाटकं आपल्या लाखो डोळ्यांनी तल्लीन होऊन पहायची चिंच. चिंचेखालीच रंगलं पहिलं व्याख्यान गावातलं शिवजयंतीला शिवचरित्रावरचं. इथेच पोवाडे रंगले, पत्त्यांचे डावही रंगले, मटक्याचे आकडे ऐकायला गर्दी झाली इथेच अन् सतीदेवीच्या यात्रेतल्या बोकडबळीच्या कातडय़ाला लिलावही मांडला गेला याच चिंचेखाली. तिने ऐकली पांडू सोनाराची प्रभातफेरीतली अभंगवाणी अन् दारु पिऊन ग़ावगर्जना करणाऱ्या दारुडय़ांची लाखोलीही.

असं बापमाणूस वाटणारं हे चिंचेचं झाड जेव्हा चिंचफळं उतरवण्यासाठी झोडलं जायचं तेव्हा त्याची अवस्था अतिशय केविलवाणी वाटायची. एखादय़ा सत्शील राजाचं राज्य गारद्या-पारध्यांनी फितुरीनं लुटावं तशी. असहाय. चिंचेचं हे रुप मात्र काळजाला चरे पाडणारं, घायाळ करणारं.

आज गावापासून दूर राहत असतांना मनात मात्र खोलवर रुजलयं हे चिंचेचं झाड, गाव आठवतं, मायभूमी आठवते, आई-वडील, भाऊ, मित्र, स्नेही परिवार, गल्ली बोळ, शाळा, देवळं सारी चित्र मन पटलावर उमटतात पण या चिंचेची मूळं मात्र मनात घट्ट रुतलेली. आईच्या डोळ्यांनी वाट पाहणारी, स्वागतासाठी आतूर आर्त..

चिंचेचं हे झाड नव्हेच! कल्पतरुच तो आमच्यासाठी. आनंदाचं उगवून आलेलं झाड. आयुष्य व्यापून उरलेलं. कमालीचा अभाव, दारिद्रय़ाच्या दुष्टचक्रातही आनंदाची उधळण करणारं. त्याच्या आठवणी मनाला सतत तज़ेला देणाऱ्या. सुखामागे धावताना मी नेहमीच त्या सुखद आठवणींत रमून ज़ातो. स्वतःच आतआतून फूलून बहरून येऊ पाहतो.. शब्द फुलांनी, चिंचेसारखं!




बाजार
लखावल्या
रेघोट्या

देवनदीची चढण ही अशी चढून गावाकडं निघालो की, आपण बाजारतळाच्या पटांगणात येतो. एकीकडं सुतारन्येहा, कुंभारवाडा असं थेट नदीपर्यंत उतरत गेलेलं गाव अन् दुसरीकडं चिंचेची बाग यांच्या दुभाळक्यात बाजारतळाचा विस्तार झालेला. इथंच चिंचेची, वडाची मोठमोठी झाडं, त्यांना बांधलेले पार, नदीकाठावर गावातल्या काही थोर पुरुषांच्या समाध्या. स्मशानभूमी, मुस्लिमांची दफनभूमी, लिंगायत समाजाची थडगी अशा चिरशांती घेतलेल्या पूर्वजांनी या जागेला वेढा घातलेला. अगदी याच ठिकाणी देवनदी वळसा घालून मेंढी-चोंढीच्या दिशेने धावू लागते.

सर्वत्र बांधलेले छोटे-छोटे मातीचे बाजार ओटे. आताशा ग्रामपंचायतीने बांधलेलं बाजार शेड पाहिल्यावर ही जागा आठवडे बाजाराची असावी असं सहज लक्षात येतं. गावाच्या पूर्वेला नदीकाठी असलेल्या या बाजारतळानं आमचं अख्खं लहानपण खेळवत-खेळवत आम्हाला आपल्या अंगाखांद्यावर मिरवलेलं..

एरवी ओकीबोकी वाटणारी ही जागा बुधवारच्या आठवडे बाजारी कशी फूलून यायची, मोहरून जायची. आजूबाजूच्या दहा-बारा खेड्यांतील वाटा बाजाराच्या दिशेने धुवट, नीटनेटके कपडे लेऊन, डोईवर पाट्या, माळवं, पिशव्या घेऊन चालू लागायच्या. शेतकरी, मजूर, पोरंबाळं.. सगळ्यांचा हा आनंदाचा दिवस. बाजार म्हणजे दर आठवड्याला भरणारी जत्राच ती!

तालुक्याच्या गावातले व्यापारी दुकानदार आपापली दुकानं घेऊन यायचे अन् बाजार ओट्यांवर पालं ठोकायचे. गुळवाले, किराणा वाले, मसालेवाले, आयते कपडे, कापड दुकानं, हरेक माल, सुया-बिबवे-फणी-कंगवे, कुलूपं-किल्ल्या बनवणार, स्टील-जरमनची भांडी, मटण-मासे, बोंबील-झिंगे, झाडू, शिरया, भेळ-भत्ता, जिलबी, गोडीशेव, लहान मुलांची कचकडयाची खेळणी, पोळपाट-लाटणे, खुरपे-विळे, दोरखंड, आंबे, केळी, चिक्कू-सफरचंद अशी कितीतरी दुकानं! बाजारतळ सजून-गजबजून जायचा.

एका बाजूला हिरवी आळी, सगळी माळवं-भाजीपाल्याची रांग बसलेली. अधून मधून धान्याची बोचकी. गहू, बाजरी, ज्वारी, मठ-मूग, कुळीद असं इरवड घेऊन शेतकरी बसलेले. नाकातल्या भल्या थोरल्या नथीला सावरीत, मिसरीचं बोट गूपचूप दातांवरुन फिरवीत पुन्हा काटा-माप हातात धरणाऱ्या बायका, कशिदय़ाच्या, झालरीच्या पिशव्या घेऊन खरेदीला लोटलेली पंचक्रोशी.

'चला सस्ते लावले' 'आता थोडेच राहिल्ये बरं का!' 'चला इकडं खाणाऱ्याची मजा!' अशा कितीतरी भूरळ पाडणाऱ्या आरोळ्या. दोन-पाच रूपयांत हातातली पिशवी भाजीपाला, खाऊ अशा बाजार वस्तूंनी शिगोशीग भरून जाई. हट्टानं ताईचं बोट धरून हा बाजार पालथा घालताना किती मजा यायची. एखादेवेळी प्लॅस्टिकची मोटारगाडी, शिट्टी, भोवरा, चेंडू असल्या वस्तूंसाठी हट्ट करायचो. भरल्या बाजारात भोकाड पसरून, प्रसंगी आवडलेली वस्तू दुकानातून उचलून हातात घेऊन ताईची पंचाईत करायचो. बऱ्याचदा ती हा हट्ट मोडून काढायची अन् कधी कधी एखादी गरजेची वस्तू घेणं टाळून लाडकोडही पुरवायची.

बाजारचा एक विशिष्ट गलका असायचा. सर्व आवाजांचा मिळून एक आवाज. कधी आठवडे बाजारी गावात तमाशाचा फड उतरायचा. तमाशाची जाहिरात करणारी गाडी पंचक्रोशीत फिरायची. मधून-मधून बाजारतळावर यायची. तमाशाच्या या जाहिराती 'कड कड कड कड, ढंगळांग मचळांग, आला आला आला तमाशाऽऽ, तमाशाऽऽ, तमाशाऽऽ, अशा मोठय़ा मजेदार ढंगात असायच्या.

शाळा सुटल्यानंतर आमची बच्चे कंपनी तमाशाच्या राहुटय़ा-तंबू भोवती गर्दी करायची. कनात लावून रूपया-दोन रूपयांत जुने मराठी चित्रपटही याच आठवडे बाजारी मनमुराद पाहिले आहेत. निळू फुले, अरुण सरनाईक, जयश्री गडकर, यशवंत दत्त, दत्ता साळवी, वसंत शिंदे, गणपत पाटील, अशोक सराफ ही मंडळी घरातल्या माणसांइतकी चिरपरिचित झालेली!

पोळ्याचा आठवडे बाजार मात्र वरच्या वेशीला बसस्टँडच्या परिसरात भरायचा. बैलांचे निरनिराळे रंग, आभूषणे हे या बाजाराचे खास वैशिष्ट्य! चवर, छंबी, गोंडे, कासरे, नाडे, गेरू, हिंगुळ, क्वचित झुली, घाट्या, घुंगरं असा सगळा साज असायचा. पूजेसाठी मातीचे बैल विक्रीला असायचे. मोठ्या आकाराचे मातीचे बैल घेण्यासाठी जीव फार तुटायचा पण घरातून मात्र त्यास विरोध! लहानपणी एकदा कधीतरी हट्ट करीत बैलांची जोडी घेतली तर घरी नेतानाच कुणाचा तरी धक्का लागून एका बैलाचा पाय मोडला. त्यावर्षी पोळ्याच्या सणाचा आनंदच घेऊ शकलो नाही. माझ्या बालवयातल्या आनंदाचाच पाय मोडला होता जणू!

(आता मुलांना या मातीच्या बैलांमध्येही फारसा रस नाहीये. गेल्या पोळ्याला त्यांना मी जबरदस्तीने मातीच्या मोठ्या बैलांची जोडी विकत घेऊन दिली. खरे तर हरवलेलं, निसटून गेलेलं बालपणातलं ते सुख मिळवण्याचा मी केलेला तो केविलवाणा प्रयत्न असावा!)

बाजारात नवनाथसारखे काही मित्र दुकानदारांचे सामान वाहून देणे, बाजार ओटे साफ करणे अशी कामे करीत. सुनील लोहारकर थरथरत्या डोक्यावरून भल्या थोरल्या तांब्याच्या हंड्यानं पाणी वाहून भावाच्या मदतीनं आख्ख्या बाजाराला चहा-पाणी पाजीत असे.

गावाचा कुठलाही महत्वाच्या कार्याचा मुहूर्त बाजारच्याच दिवशी असे. निवडणुकीच्या प्रचार सभा, गणपतीच्या ओट्यावरची नाटकं, कनातीतले पिक्चरचे खेळ, तमाशे, ग्रामपंचायतीचे लिलाव, विकासकामांची उद्‌घाटनं सगळं काही याच दिवशी. आठवडाभराच्या वाणसामान, भाजीपाला आदी बाजार वस्तुंबरोबरच पुढच्या बाजारापर्यंत पुरेल इतका उत्साह, चैतन्य, जोश, तरतरी हा बाजार कष्टाने पिचलेल्या मनांमध्ये भरायचा. बाजाराच्या गलक्याबरोबरच त्याचा एक विशिष्ट वासही असायचा, कृत्रिमतेचा लवलेश नसलेला नैसर्गिक! माझ्या मनाने तो आजवर साठवून ठेवला आहे!

बहूरुपी, रायरंद, वासुदेव (याला आम्ही गोपीबाबा म्हणायचो) गारुडय़ाचे खेळ, डोंबारी यांचेही खेळ बाजारचा दिवस साधून बाजारतळाजवळच गर्दीचे ठिकाण अन् सावली हेरुन रंगायचे. शनिखालची चिंच या सगळ्यांची साक्षीदार राहिली आहे..

बाजारात जायचा तो उत्साह आता केव्हाच मावळलाय! नाही म्हणायला बायकोच्या आग्रहाखातर तिच्यासोबत शहरातल्या बाजारात जातोही. पण या बाजारात फक्त माझा देह फिरत असतो मन तर कधीच पिसासारखं हलकं होऊन वडांगळीच्या बाजारतळावरील चिंचेच्या झाडावर जाऊन बसलेलं असतं. त्या आरोळ्या, तो आवाज, तमाशा-पिक्चरच्या जाहिराती, मसाल्याचा, भाजीपाल्याचा, तळलेल्या खाऊचा असा वेगळाच वास.. अशा चित्रांची अन् सयींची साय मनावर दाटून आलेली असते आणि इकडे हातात बाजाराची पिशवी कोंबत बायको 'कुठं हरवलात?' असा मिश्किल सवाल करीत घराकडं दामटत असते...



नानांची सायकल अन् वारीची पालखी



शिलाई मशीनचे पायडल मारून थकलेल्या नानांच्या पायवाटेची धूळ भंडारा म्हणून कपाळावर माखल्यावर मी एका नव्या ऊर्जेने भारावून जातो आजही! पाठीशी संसाराचं गाठोडं टांगत नाना आयुष्यभर सायकलवर पायडल मारीत गावोगावी फिरत. मी तर त्यांच्या तळहातावरला फोड! मला सायकलवर ते अगदी जपून नेत. सायकलवरून फिरताना त्यांनी एक साधी जुनी, वापरलेली लुना घेण्याचं स्वप्न पाहिलं. पण ते कधीच आकारलं नाही. नानाचं हे स्वप्न आजही मला माझ्या एकांतात छळत असतं. कधीकाळी नानांना मी सायकलवर बसवून निवृत्तीनाथांच्या चरणी लीन झालो होतो याच्या स्मरणानं हा स्वप्नभास अधिक गहिरा गहिरा होत जात असतो..

नानांना सायकलवरुन फिरण्याची भारीच हौस! एरवी शिवणकामाच्या धंद्यात त्यांना पायी फिरायलाही उसंत नसे. मात्र कुणी मित्र मंडळींनी सायकलवरुन वणी अथवा त्र्यंबकेश्वरची वारी करण्याचा प्रस्ताव मांडला की ते तत्परतेने त्यात सामील होत. मग भाड्याने सायकल घेऊन यात्रेची तयारी होई अन् नाना मस्त फिरुन येत. आम्ही भावंडं आपली खेळणी अन् खाऊच्या आशेने त्यांच्या वाटेकडे डोळे लावून बसत असू.

वडांगळीपासून सुमारे साठेक किलोमीटर अंतरावर वणीचा गड अन् त्र्यंबकेश्वराचंही अंतर साधारण तेवढंच! पलीकडे साईबाबांची शिर्डीही पंचावन्न ते साठ किलोमीटरवर. ही तीन ठिकाणं साधारण सायकल फेरीच्या टप्प्यातली. त्यातल्या त्यात वणीचा गड मात्र नानांच्या ट्रीपचं आकर्षण. त्यांच्या अधिक़ाधिक़ फेऱ्या वणीलाच झाल्याचं मला आठवतं. फार नाही पण चार पाच जणांचा चमू आपापल्या सायकलींना व्यवस्थित तेलपाणी करुन, एकदोन वेळचा डबा बांधून यात्रेला निघत. सोबत सायकलला हवा मारण्याचा पंप, एखादं नवं कोरं ट्यूब, पंक्चरचं साहित्य असा सरंजाम, चादर सतरंजीची छोटीशी वळकटी पण असायची.

नानांना अधून मधून कपडे बेतण्यासाठी पंचक्रोशीतल्या निरनिराळ्या खेडय़ांवर वस्त्यांवर सायकल मारत जावं लागायचं. पण घरात स्वतःची सायकल काही नव्हती. रात्रंदिवस डोळेफोड करुनही मशिनच्या चाकाची गती स्वतःची सायकल विकत घेण्याइतपत प्रगतीचा टप्पा काही गाठू शकत नव्हती. तास दोन तासाचं सायकल भाडं भरणं काही त्यामानाने ज़ड जात नसे. बऱ्याचदा हट्टाने मागे लागून मी नानांसोबत सायकलवरुन कपडे बेतण्यासाठी जात असे. जिथे कपडे बेतायला जात असू ते मोठ्ठं खटल्याचं घर असे तीस-पस्तीस माणसांचं! टेलरचं पोरगं म्हणून त्या घरात माझ्याही वाटय़ाला वेगळं कौतुक येत असे. मग उगीचच आपली हुशारी दाखवण्यासाठी मी वहीमध्ये वडीलांनी सांगितलेली मापं लिहून घेत असे. वडांगळी सारख्या खेडय़ातच राहत असलो तरी त्या आणखी खेडयांतल्या, रानवस्त्यांतून राहणाऱ्या पोरांसमोर मी आपला भास मारुन घेई. काम आटोपल्यावर बऱ्याचदा जेवणाचा आग्रह होई. दोन तीन पिशव्या भरुन वानवळा मिळे, चहा ऐवजी दूध प्यायला मिळायचं, झाडावरच्या पपया, आंबे, पेरु असेल ती फळं खाऊ म्हणून मिळायची. किती चंगळ! आणि म्हणूनच नानांबरोबर सायकलवरुन कपडे बेतायला जाणं हा आत्यंतिक आनंदाचा भाग असायचा. माझ्या वाटय़ाला कदाचित घरात मी मोठा असल्यानं वारंवार यायचा.

अनेकदा सायकलला मागे कॅरेज नसायचं मग नाना पुढच्या दांडीला ती बसतांना रुतू नये म्हणून टॉवेलची गुंडाळी बांधत. मग आमची स्वारी त्यावर आरामात बसून कधी घंटी वाजवित तर कधी रस्त्यातल्या गाय वासरं, शेळ्या, मेंढयांना हुसकावीत विमानात बसल्याचा आनंद लुटीत असे. कॅरेजवर मागे बसलेलं असतांना चैनीत पायाची बोटं अडकणार नाहीत याची काळजी घ्यावी लागे. पुढच्या दांडीवर बसलेलं असताना पुढच्या चाकाच्या तारांपासून बोटं वाचवावी लागत. असं काही झालं तर मग मात्र सायकलच्या या आनंदाला मुकावं लागेल अन् दुखापत होईल ती वेगळीच ही जाणीव त्या बालवयातही होतीच.



*लहानपणी आमच्याकडे कपडे शिवायला जे कोणी गिऱ्हाईक सायकलवरुन आजूबाजूच्या खेडय़ांवरुन येत त्यांना लाडीगोडी लाऊन त्यांच्या सायकली पिटाळणं हाही आमचा आवडता उदय़ोग असे. सायकल शिकण्यासाठी भाडय़ानं घेणे व भाडं भरणे ही चंगळ तेव्हा परवडणारी नव्हती. सायकल शिकणं म्हणजे एक हात हँडलला, एक हात वरच्या दांडीला व बगलेत शीट आवळलेलं! एक पाय पायडलवर ठेवून दुसरा चेनकव्हरवरुन टाकून अर्धा पायडल मारीत सर्कस चाललेली. अनेकजण सायकलचं नुकसान होईल याचा विचार न करता आम्हाला सायकलची चक्कर देत. (आज स्वतःच्या मालकीच्या वस्तूंची किंमत कळत असतांना त्यांचं दातृत्व लक्षात राहिलेलं.)*



*सायकल चालवणं जिथे चैन ठरावं अशा काळात मोटारसायकलचं किती अप्रूप. माझा वर्गमित्र सुभाष शिंदे त्याच्या वडीलांची राजदूत गाडी तो सातवी आठवीत असतांनाच शिकला. ज्यावेळी उभी असलेली गाडी मला पेलवत नव्हती त्यावेळी तो आम्हा मित्रांना डबलशीट घेऊन गाडी उडवायचा. मोटारसायकलवर मागे डबलशीट बसतांनाही आपण कुणीतरी मोठे असल्याचा भास होई. मात्र, मित्राची मर्जी सांभाळण्याची मोठी कसरत त्यासाठी करावी लागे व परिस्थितीचं भान येत असे.*

*लुना, टीव्हीएस-फिफ्टी अशा मोपेडचा जमाना तेव्हा जोरात होता. संधी मिळालीच तर एखादय़ा मित्राची, गिऱ्हाईकाची लुना घेऊन नाना हिवरगावपर्यंत पाच-सहा किलोमीटरची मोठी चक्कर मारुन यायचे. सायकल घेण्याची ऐपत नसतांना तेव्हा नाना मात्र एखादी सेकंडहँड लुना दोनेक हजारापर्यंत विकत घेण्याचं स्वप्नं पाहू लागले. शिलाई मशिनच्या चाकांची गती वाढली. रात्रपाळ्या, जागरणं वाढली. रात्री-अपरात्री ऊठून कपडे शिवणं सुरु झालं. कुटूंबाच्या गरजा वाढत असतांना, मुलांची शिक्षणं चढत्या आलेखाप्रमाणे उंचावत असतांना नानांची मशिन कामातली कमाई मात्र कापरासारखी उडून जाऊ लागली.*


तेव्हा मी दहावीत असेन. नानांनी लुनाचा ध्यास घेतलेला. बँकेचं रेडीमेड कापड दुकानासाठी तीन हजार रुपयांचं कर्ज घेऊन काही स्वतः जमवलेले पैसे त्यात टाकून त्यांनी दोन हजारातल्या लुनाचं स्वप्न प्रत्यक्षात आणायचं ठरवलं. माझी दहावीची बोर्डाची परीक्षा सुरु होती. मी सिन्नरलाच आमच्या एका सुहृदयी नातेवाईकांकडे परीक्षेपुरता थांबलेलो. याच काळात नानांचं लुनाचं हे स्वप्नही विरलं. ज्यांच्याकडे दुकानाचा माल, फर्निचर खरेदी केलं त्यांनीच अव्वाच्या सव्वा किंमती लावून नाडल्याने नानांचा जीव होरपळला. दुधाची तहान ताकावर भागवत त्यांनी सिन्नरहून नवी कोरी सायकल विकत घेतली व मला सिन्नरला ती सायकल दाखवून ते त्या दिवशी सायकलवर बसूनच सिन्नर ते वडांगळी अंतर पायडल मारीत गेले.

दरम्यान दहावीनंतर भरवशाचा म्हशीला टोणगा व्हावा असे कमी मार्क मिळाल्याने मला मनाशी खूप ठरवलेल्या डी. एड ऐवजी आय.टी. आय. चा मार्ग निवडावा लागला. कॉलेजची पाच-सात वर्षाची खर्चिक मळवाट आपल्या कुवती बाहेरची असल्याची जाणीवही नानांनी करुन दिली. आय.टी. आयला प्रवेश घेतला तेव्हा मी पंधरा-साडे पंधरा वर्षांचा असेन. एक महिना नाशकात काढून मी सिन्नरला मित्रांबरोबर खोली घेऊन सिन्नर-नाशिक असे रोज ये जा करु लागलो.

एक दिवस दूपारच्या वेळी नाना दोन अडीचच्या सुमारास वडांगळीवरुन सायकल मारीत आय. टी. आय. वर धडकले. मला गेटवरुन निरोप मिळाला. माझी सुटीची वेळ होतच आली होती.

'आपल्याला त्र्यंबकेश्वरला जायचंय' नाना म्हणाले. सकाळपासून सायकलवरुन नाशिकर्पयतचा पल्ला गाठतांना त्यांचा दमपूरा झाला होता. मी पळतच जाऊन डबा, दप्तर घेऊन आलो.





'चला नाना बसा मागे' म्हणत मी नानांना डबलशीट घेऊन त्र्यंबकची वाट चालू लागलो. शरीराने मी तोळमासा. तर नाना चांगले भरभक्कम तरीही त्र्यंबकची ती चढ-उताराची नागमोडी असलेली वाटही माझ्यातल्या अनामिक ऊर्जेने सरधोपट बनून गेली. रस्त्याने जाणाऱ्या गाड्यांची गर्दी, वाहनांची वर्दळ यावरुन उद्या त्र्यंबकची यात्रा असल्याचा कयास मी बांधला होता. इतरवेळी मित्रांबरोबर सायकलफेरीला निघणारे नाना यावेळी किरणला सोबत घेऊन जाऊ असं ठरवून मला घ्यायला आयटीआयवर आले होते.

गावोगावच्या दिंड्या-पालख्या आधीच निवृत्तीनाथांच्या चरणी जाऊन विसावल्या होत्या. नानांच्या या सायकलवरच्या वारीत मीही अर्ध्यातून सामील झालो होतो. त्यांना डोळ्यांपुढे निवृत्तीनाथांची समाधी दिसत होती. उत्साहात पायडल मारणारा मी आता थकून गेलेलो. घंघाळ तळ्याशी पोहोचलो. तिथे हात पाय धुवून थोडा विसावा घेतला. पुन्हा नवा उत्साह संचारला अन् नज़रेच्या टप्प्यात आलेल्या त्र्यंबकेश्वरच्या दिशेने मी सायकलची गती वाढवली. आता माझ्या लेखी ती सायकल नव्हती. खांद्यावर पालखी वाहून नेणाऱ्या शेकडो वारकऱ्यांप्रमाणे नानांची सायकल माझ्यासाठी त्र्यंबकच्या वारीतली पालखीच होती. पुन्हा एकदा मी जोमाने पायडल मारु लागलो. श्रवण बाळाच्या निष्ठेने..


'आमची अडाण्याची आळी'

गाव कोणतं तुमचं?'

'वडांगळी'

'काय? खुळे म्हणजे खुळे का तुम्ही?'

असे संवाद माझ्या बाबतीत नेहमीच घडतात. कुणाही अनोळखी व्यक्तीशी परिचय करुन घेतांना किंवा देतांना मला 'तुम्ही खुळे का?' हा प्रश्न हमखास विचारला जातो. आमच्या गावात साधारणतर् सत्तर टक्क़े कुळं 'खुळे' आडनावाची. त्यामुळे सर्वदूर 'खुळ्यांचा गाव' अशीच ओळख निर्माण झालेली. कुणीही वडांगळीचा म्हटल्यावर 'खुळेच' असणार असा समोरच्याने बरोबर कयास बांधलेला असतो. अशा या खुळ्यांच्या गावात आम्ही आपले 'अडाणी'.



गावातली आमची गल्ली 'अडाण्याची आळी' म्हणूनच ओळखली जाते. गावातले सगळे खुळे आम्हाला 'अडाणी' म्हणतात.. समजतात! खरं तर तेही खुळे नाहीत अन् आम्हीही अडाणी नाही. सग़ळे शब्दांचे खेळ. गावातील सगळ्यात मोठी गल्ली आमचीच. एस. टी. स्टँडवर उतरलं की पहिली सरळसोट दिसते ती आमचीच गल्ली. गावात पूर्वेकडे प्रवेश करणारी. तोंडाशीच विठ्ठलाचं मंदिर. विठोबाच्या पायी माथा टेकवून पुढे सरकणाऱ्या या आळीत शंभरेक पावलांवर बहिरोबाचं देऊळ आहे. तिथून ही गल्ली उजवीकडे वळून नदीवर जायला निघते. पन्नास एक पावलं आणखी पुढे चालत गेलं की आपण शनिचौकात पोहोचतो. इथेच दोन सुंदर मंदिरं भेटतात सुरेख नक्षीकामाचे कळस असलेली. एक दत्ताचं अन् दुसरं शनिचं! दोन्ही मंदिरं चौकातच असली तरी दत्ताचं देऊळ आमच्या गल्लीत उभं तर शनिखालची चिंच शनिमंदिराच्या पाठीशी! गावाच्या जन्मापासून त्याची साथ संगत करीत पाठराखण करणाऱ्या या गावातल्या भल्यामोठ्या आणि एकमेव चिंचेच्या झाडाला ओळख मिळालीय ती शनिच्या मंदिरामुळं! दत्ताच्या पायाशी झुकून गल्ली पुढे देवनदीकडे सरकते... शनिमंदिराला वळसा घालून चिंचेच्या पायाला हात लावून हसत हसत नदीच्या दिशेने चालू लागते.



तिच्या शेवटच्या टोकाशी पुन्हा देवळंच देवळं! प्रथम कालिकेचं मंदिर त्याच्या शेजारी घोडय़ावर आरुढ झालेल्या खंडोबाचं छोटेखानी देऊळ! जवळच गावात फार पूर्वी मरण पावलेल्या एका वानराची समाधी अन् मूर्ती! अन् अगदी शेवटी मारुतीराया! त्याचंही भलं मोठं मंदिर अन् त्याच्या पाठभिंतीशी मशीद.. पांढरी शुभ्र!

गाव मुळातच दुष्क़ाळी! कैक पिढय़ा दुष्काळाशी सामना करीतच गमावल्या. गावात बहुतेक घरं धाब्याचीच कडी-पाट अथवा किरळ-वाश्यांवर खाऱ्या मातीचा पेंड टाकून बांधलेली. निम्मी अर्धी विटांची, काही मातीच्याच भेंडय़ांतली. जिथलं पर्जन्यमान क़मी त्या भागात बहुधा धाब्यांची घरं आढळतात. मला तर ती दुष्क़ाळाचं प्रतीकच वाटतात. आमच्या आळीतही याच प्रकारची घरं होती. अख्ख्या गल्लीत एकच दुमजली कौलारु इमारत होती. शनिचौकाशी.. भाऊ चिमणाजीची! अशी एकंदर गल्लीची स्थिती. घरांच्या बांधणीवरुनही एकंदर गल्लीची गावाची आर्थिक स्थिती लक्षात येई.

आमच्या आळीतली बहुतेक मंदिरंही माणसांच्या घरांसारखीच.. धाब्याची. बाहेरुन घर कोणतं अन् मंदिर कोणतं हे लक्षात येऊ नये अशी. माणसांच्या गर्दीत देवही येऊन राहिलेले. आत डोकावल्यावर नज़रेस पडणारी घंटा व मूर्तीवरुन हे मंदिर असल्याचं लक्षात येई. सग़ळेच देव असे शेजारी बनून राहिलेले.. सख्खे शेजारी. आपलं देवत्व विसरुन माणसांशी एक़रुप झालेले.

सग़ळ्या गावाची उपज़ीविका शेतीवर आधारलेली. आमची आळीही त्याला अपवाद नाही. पण अप्रत्यक्ष किंवा प्रत्यक्षही! ही सगळी गावाच्या व्यवस्थेतली बलुतेदार मंडळी. गावगाडय़ात यांचाही तितकाच मोठा सहभाग मात्र यांचा पोशिंदा शेतक़री! उदरभरण ज्यातून होतं पोटाला अन्न मिळतं त्या शेतात राबणारा, शेतीची कामं करणारा शेतक़री. अन्न पिकवण्याच्या मूलभूत ज्ञान त्याला असल्यानं तो खऱ्या अर्थानं ज्ञानी अन् बाकीची सारी प्रजा अडाणी असं त्याचं साधं सरळ तत्वज्ञान या न्यायानं आम्ही आपले अडाणी.

खेडय़ात असूनही मातीपासून क़ाहीशी तुटक.. राहणीमानात चोखंदळपणा, घरांची रचना, साफ सफाई, सडा रांगोळी, घरगुती काम करणाऱ्या बायका, बऱ्यापैकी छानछौक़ीचे कपडे क़ेलेले गडी माणसं.. मुलं! शालेय शिक्षणाच्या बाबतीतही आमचीच आळी आघाडीवर! बरीचशी पांढरपेशा कुटूंबं इथं एकवटलेली. मागची आळीही साधारणतर आमच्याच आळीचं अनुकरण करणारी अन् शेजारची पेठेची गल्ली.. तिच्यावरही अधिराज्य आमच्याच आळीचं असे. आजुबाजूच्या दहा बारा खेडय़ांतील लोक इथेच खरेदीसाठी येत असल्याने बाजारपेठही चांगलीच नावाज़लेली. प्रत्येक खेडय़ात एक शहरही असतंच वसलेलं! आमची आळी त्यातलीच.. निम्मीअर्धी शहरी. खेडय़ातली म्हणावी तर थोडी पांढरपेशी अन् शहरी माणसांच्या मानाने खेडवळच अशी.. मधलीच अवस्था! गावात येणाऱ्या नोक़रदारांचीही पहिली पसंती आमच्याच गल्लीला असे. आमच्या आळीने अनेक़ नोक़रदारांची कुटूंब आपल्यात सुखेनैव सामावून घेतलेली. बदली झाल्यावरही हे गाव गल्ली सोडून ज़ाणं अनेक़ांच्या जिवावर येई. काहीशी मृदू भाषा, वागण्या बोलण्यात नम्रता, धार्मिक, सामाजिक उत्सवात समरसून सहभागी होणं, अडल्या नडल्या प्रत्येकाच्या मदतीला धावणं, संकट प्रसंगी मदतीचा हात देणं ही या आळीची वैशिष्टयं! आजच्या अर्थशास्त्रीय भाषेत उत्पादक़ अन् अनुत्पादक़ क्षेत्र ज्याला म्हणतात ती मला गावाचा विचार करतांना आता दिसू लागतात. सगळ्यांचा पोशिंदा शेतकरी वर्ग एका बाजूला अन् त्याला लागणाऱ्या सग़ळ्या सेवा पुरवणारी ही अठरा पगड जातीतली उतरंड एका बाजूला अशी विभागणी झालेली. ही सगळी आळीच्या आळी सेवा उदय़ोगात! कुणी न्हावी, कुणी सुतार, कुणी शिंपी, कोणी सोनार, क़िराण्याच्या वाण सामानाचं दुक़ान घालून बसलेला वाणी, हर प्रकारच्या सेवेसाठी तत्पर असणारी ही मंडळी! मात्र पोशिंद्याबाबतीत तितक़ीच क़ृतज्ञ! त्याच्या सुखदुःखात रममाण झालेली.





पावसाळ्याचे चार महिने शेतकरी कामात गुंतला की, केवळ काम एके काम. मग बाजारपेठ थंडवायची. अडाण्याच्या आळीवर हे चार महिने मंदीचे मळभ दाटलेले. सुग़ी सुरु झाली की मग़ सग़ळ्यांचीच चांदी! पावसाळ्यात अनेक़ कुटूंबांची आर्थिक ओढाताण होई, त्यासाठी हंगामाच्या, सुगीच्या दिवसांतच धान्यधुन्य, डाळीसाळी, तिखटमिठाची तजवीज करुन ठेवण्याकडे कल असायचा. मंदीच्या काळात एरवी सदैव उत्साही असणारी ही आळी आपले हातपाय आखडून घेई. घरोघरी मग हरीविजय, भक्तिविजय, नवनाथ अशा पोथ्या सुरु होत. श्रावणी सोमवार, शनिवारी साठा उत्तराच्या सुफळ संपूर्ण कहाण्या घरोघरी वाचल्या जात. उपासतापास, व्रतवैकल्यात स्वतःला बुडवून घेत मंदीच्या झळा सोसण्याचा प्रयत्न होई.


मनूबाबा अन् भागुबाई, सोपानकाका अन भिमाबाई, यादवबाबा अन् धुरपदाबाई अशी शेतक़री कुटूंबही होती आमच्या आळीत पण आळीचे सगळे वाण अन गुण त्यांच्या अंगी भिनलेले. कुठलीही सत्ता हाती नसतांना ग़ावाचं सांस्क़ृतिक नेतृत्व करुन गावाच्या कारभाराची आर्थिक घडी बसवणारे लक्ष्मणतात्या. सोनारकी करता करता गावकऱ्यांच्या गळ्य़ातला ताईत बनले. आपले दातृत्व अन् दूरदृष्टीने गावाच्या शैक्षणिक विक़ासाचा पाया त्यांनी रचला. अनेक़ मंदिरांचे जीर्णोध्दार घडवून आणले, त्यांच्या डागडूजीची तरतूद केली. हे सगळं करुनही त्यापासून अलिप्त नामानिराळे असं सोनेरी आयुष्य जगून आमच्या आळीला सुवर्ण झळाळी देणारे लक्ष्मणतात्या! विठ्ठलाची पुजा करीत आयुष्य वेचलेले अन् कमालीच्या दारिद्र्य़गर्तेतून आपल्या कुटूंबाला आकार देणारे कांताकाका कासार, विठोबाच्या देवळात काकडारतीची मुहूर्तमेढ रोवणारा, संसारापेक्षाही भजन-कीर्तनातच अधिक रंगलेला काशिनाथ रंगारी, चेहऱ्याला रंग लावून रंगभूमी गाजवणारा दग़ू न्हावी अशा पूर्वजांनी या आळीला रंगरुप दिलेलं.. स्वतःची ओळख दिलेली.

गावातही दोन भाग़.. एक खालचा वाडा अन् एक वरचा वाडा. भौगोलिकदृष्टय़ा म्हणण्यापेक्षा व्यवहाराच्या सोयीने पडलेले. गाव तसं एकोप्याचं वरचा वाडा आख्खा आणि केवळ गावातल्या खुळे कुळांसोबतच इतर कुळं अन् इतर सग़ळ्या अठरापग़ड जातींचा समावेश खालच्या वाडय़ात. वाडय़ांतला हा फरक लक्षात येई तो पोळ्याच्या बैलांच्या मिरवणूकीवेळी वरच्या वाडय़ाचा मान पहिला. ही मिरवणूक आटोपल्यानंतर खालच्या वाडय़ाचे बैल मिरवायला निघत. आमची आळी अर्थातच खालच्या वाडय़ात.

आमच्या गल्लीतल्या क्वचितच कुटूंबांक़डे स्वतःचे बैल असत. पोळ्याला मनुबाबाचे बैल मिरवणूकीत धरण्यासाठी आळीतल्या आम्हा पोरांमध्ये चढाओढ लागायची अन आळीपाळीने प्रत्येकाच्या हातात कासरा येई. एका बैलामागे दोन दोन तीन तीन ज़णांची बैलांचा ताबा घेण्यासाठी रेटारेटी सुरु असायची. पोळय़ाच्या मिरवणूकीत बैल मिरवण्यातही मोठी मर्दुमकी वाटायची. सक़ाळपासूनच आम्ही त्या बैलांच्या आगेमागे करीत असू. त्यांची शिंगे साळणे, शेप कातरणे, शिंगांना हिंगूळ देणे. त्यांच्या अंगावर गेरुचे, निरनिराळ्या रंगांचे छाप वठवणे अशी कितीतरी बैल सज़वण्याची कामे आमच्या घोळक्यातच होत.

हे सग़ळं असलं तरी विस्थापितांची मोठी संख्याही याच आळीत. पोरं शिकली सवरली की नोकरी-धंद्यानिमित्त बाहेर पडत. तिकडेच स्थिरावत. अशी अनेक़ कुटूंब नंतर पोटा पाण्यासाठी गाव सोडून ग़ेलेली. परग़ावी बहुतेक मोठमोठ्या शहरांतून स्थिरावलेली. तिथेही आमच्या गावाचं.. वडांगळीचं प्रतिनिधित्व करणारी. सणावारी.. विशेषतर् सतीदेवीच्या यात्रेला ही सग़ळी मंडळी गावी येतात. गल्ली आनंदाने मोहरुन जाते. अनेकांची घरंही गल्लीत उरलेली नसतात. पण आठवणींचे धागे मनाला ओढून आणतात अन् पावलं साहज़िकच घराची वाट चालू लागतात.





स्मरणयात्रेत
हरवलेलं
गांव

स्मरण यात्रा

हल्ली-हल्ली नवरात्राला गणेशोत्सवासारखं स्वरुप येत चाललंय पण आमच्या लहानपणी असा काही प्रकार नव्हता. तरीही नवरात्राची आम्ही कितीतरी आतुरतेने वाट बघत असू. घटस्थापनेला घरोघरी घट बसवले जात. पहिली माळ दुसरी माळ असे करता करता दहाव्या माळेला दसऱ्याचा आनंदाला तोटा नसणारा सण दारात हजर होई.

स्वयंपाक घरात जिथे दिवा विझणार नाही अशा कोनाड्यात ताई घट बसवत असे. घराच्या भोवतीने काळ्या मातीत गहू पेरले जात. देवही या नऊ दिवसांत घटी बसत अन् ताईचे नवरात्राचे नऊ दिवसांचे उपवास सुरु होत. आम्हाला मात्र ओढ असे ती वडजाईच्या दर्शनाची.

गावापासून एक दीड किलोमीटरच्या अंतरावर वडजाई देवीचं मंदिर आहे. गंगावाटेला तामसवाडीकडे जाताना जुन्या पांढरीवर एका शेतातल्या चबुतऱ्यावर दहा बाय दहा पेक्षाही छोटं घरवजा धाब्याचं छत असलेलं हे मंदिर! कळसाचा तोटा नसलेलं..! शेतात वस्ती करुन राहणाऱ्या एखाद्या शेतकऱ्याच्या घरासारखं. देवीच्या साधेपणाबद्दल कल्पना त्यावरुन यावी. याचठिकाणी जुनं गाव वसलेलं होतं असं म्हणतात. त्यामुळे या ठिकाणाला पांढरी असंच नाव पडलेलं. रस्त्याच्या पलीकडे जुन्या पांढरीवरच्या मारुतीचं छोटंसं मंदिर लक्ष्मण मास्तराने साकारलेलं.

एरवी गावापासून दूर दुर्लक्षित असलेल्या वडजाईची गावाला आठवण होते ती नवरात्रात. देवीची छोटीशी दगडी मूर्ती, मंदिरासमोर चबुतऱ्यावरच दगडी पादुका, देवीसमोर अखंड नऊ दिवस तेवणारा दगडी दिवा. घरं मांडलेले. घराभोवतीचे हिरवे धने अन् आजूबाजूचे हिरवे शिवार. मुख्य रस्त्यापासून शे-दोनशे फूटावर असलेल्या मंदिरातही पीकांमधून वाट हुडकीत जावं लागतं. एकदाचे घट बसले की, कधी एकदा शाळा सुटते अन् आम्ही चाकाऱ्या घेऊन वडजाईच्या रस्त्याला लागतो असं होऊन जाई. नवनाथ, पांडू, सुहास, सुभाष अशी मित्रमंडळी सोबत असायची. प्रत्येकाच्या हातात चाकारी. या चाकाऱ्याही निरनिराळ्या प्रकारच्या. कुणाची सायकलच्या जुन्या फाटलेल्या टायरची, कुणाची सायकलच्या रिंगची तर कुणी मुलं लहान लहान रिंगांना लांबलचक तारेने, तारेला रिंगच्या आकाराचं वळण देऊन मस्त रस्त्याने फिरवित चालत. चाकाऱ्यांचा वेग वाढे तसा आमचाही वेग वाढत जाई. कोणाची चाकारी रस्त्यात अजिबात पडू न देता वडजाई पर्यंत जाते याचीही शर्यत लागायची.

आमच्याकडे स्वतःची सायकल नव्हती. त्यामुळे माझ्याकडे रिंगची तर सोडा पण फाटक्या टायरचीही चाकारी नसायची. नवनाथ सारखा मित्र एखाद्या सायकल दुकानादाराकडून अथवा कुणा मित्राकडून हिकमतीने ती मला मिळवून द्यायचा. वडजाईच्या या नवरात्रांच्या दिवसांत एरवीही आमच्यातला हिरो असलेला नवनाथ आणखीच सुपरहिरो बनून जायचा. त्याच्याशी मैत्री असणं याचा सुध्दा आम्हाला कोण अभिमान असायचा! शाळा सुटण्याची घंटा झाली की कधी एकदा दप्तर घरात भिरकावतो अन् चाकारी घेऊन बाहेर पडतो असं होई. आज सायंकाळी काय धमाल करायची ते दिवसभर वर्गात ठरलेलं असे.

'ताईऽऽऽ!वडजाईला चाललो गं! असं म्हणत घराबाहेर पडून चाकारी पिटाळता पिटाळताच परवानगीची वाट न पाहता एका दमात शाळेजवळ येऊन पोचायचो. नवनाथसह इतर मित्रही तोपर्यंत तेथे येऊन आमची वाटच पहात असायचे. वडजाईच्या रस्त्यावर मराठी शाळेच्या मागे गावातल्या बहुतेक शेतकऱ्यांचे 'खळे' असायचे. या खळ्यांमध्ये एखादा झाप, ज़नावरांची दावण, झापात ज़नावरांच भूस, चारा वैरण, हंग़ाम असेल तर धान्यांची रास, वाळवण असं बरंच काही असे. साधारण बाभळीच्या काटय़ांचं काटेरी कुंपण, चार दोन फटकुटं, लाकडं यांचा दोन बाज़ूंना मेढी ठोकून बनवलेल्या दरवाज़ा असं स्वरुप असे. संध्याकाळी या खळ्यांमध्ये गायगुरांना चारा वैरण करण्यासाठी, दूध काढण्यासाठी माणसांची वर्दळ असे. सवसांजेची वेळ असल्याने रानातून दिवसभर काम करुन परतणारे शेतकरी, बायामाणसं राखुळीच्या शेळ्या, गावगुरं यांचीही गर्दी असायची. या सग़ळ्या गर्दीतून  वाट क़ाढीत आमच्या चाकाऱ्या धावू लागत.

स्म
र
ण
या
त्रा

स्म
र
ण
या
त्रा

रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्यांना हुलकावणी देत, आरडाओरडा करीत आम्ही चाकाऱ्या पळवीत असू. खळ्यांची हद्द संपली की खळगा सुरु होई. या खळग्यात मोठ लवण आहे. वडज़ाई आणि गाव यांच्या मध्यावर खळग्यातच एक तवंग लागतो. या तवंगाववर आम्ही विसावा घेत असू. तवंगाच्या आजूबाजूला रस्त्याच्याकडेला तरवडाची फार झुडपं होती, पिवळ्या धमक फुलंानी तरवड बहरलेले असत. त्याच्या फांद्या तोडून फोक काढून चाकारीसाठी काठय़ा बनवल्या जात. हेच फोक कधी कधी तलवारीचं रुपही धारण करीत अन् त्या विस्तीर्ण खळग्यात आमच्यातले मावळे जागे होत. खळग्यातला छोटय़ा-छोटय़ा टेकडय़ांच्या आडून गनिमी काव्याचे युध्द, तलवारबाजी सुरु होई. या साऱ्या युध्दात नवनाथ सेनापती वगैरे असायचा. त्याचा खास मित्र असल्याने कच्चा लिंबू असूनही माझ्या वाटय़ाला युध्दातला पराजय मात्र यायचा नाही. आयुष्यभर सदैवच मित्रांनी अशी पाठराखण केलेली. या मैत्रीचं मोल शब्दांनाही न तोलणारं!

आमचा हिरो नवनाथला मात्र असल्या खेळांमध्ये फारसा रस नसायचा. त्याचा स्वभाव मुळात अडबंग! शाळेत हुशार, चपळ व प्रत्येक गोष्टीत तरबेज असला तरी त्याच्यातला अडबंगपणा काही वेळा उफाळून येई. नवरात्रात तर खासच! मग़ तो आम्हाला इंगळ्या पक़डायला घेऊन ज़ाई. तोर्पयत आम्ही अनेक मित्रांनी इंग़ळी पाहिलेली नव्हती.

नवनाथच्या सवंगडय़ांत खरं तर आम्ही अडाण्याच्या आळीतली मुलंच अधिक! ग़ावात बहुसंख्य शेतक़री असतांना सोनार, शिंपी, वाणी, ब्राम्हण, नोकरदार अशी शेतीशी दुरुन संबंध असणारी कुटुंब आमच्या गल्लीत एकवटल्याने आमची ग़ल्ली अडाण्याची ठरली होती. अशी अडाण्याची साळसूद पोरं तावडीत सापडल्यावर नवनाथच्या मर्दुमकीला जोर चढायचा.

खळग्यातली इंगळ्यांची बिळं शोधून नवनाथ आम्हाला थोडं दूर उभं करायचा. चाकाऱ्या एका हातात जीव मुठीत धरुन, आपापल्या चड्ड्या सावरुन धरीत आम्ही एका बाजूला उभे राहत. हातात तरवडाची फोक घेऊन, इंगळी काढायचा मंत्र म्हणत. बिळाच्या तोंडाशी सावध पवित्रा घेऊन नवनाथ फोक फिरवीत घासत राहयचा.

'इंगळी का पिंगळी सलाम करतीऽ
सलाम करतीऽऽ
आणाजी पाटलाला बोलवतीऽ
बोलवतीऽऽ
सुया मारुनी मंत्र फुकीतीऽ
मंत्र फुकीतीऽऽ

असा मंत्र सुरु व्हायचा. बिळाभोवती तरवडाच्या काडीने घासायला लाग़ल्याने बिळात माती पडू लागे. माती आत गेल्यामुळे आतली इंगळी चवताळून बाहेर येई व तरवडाच्या फोकेवरच नांग़ीचे प्रहार करु लागे. इंग़ळी बाहेर आली रे आली की आम्ही क़्रितीतरी लांब पळून ज़ात असू. मग हळू हळू दबक्या पावलांनी पुढे सरकत इंगळीपासून काही अंतरावर ज़ाऊन थांबत. असू

"येऽऽ! करग़ुटा तोड करगुटा! असं कर एक पदर तोडून देऽ" नवनाथ असे आदेश द्यायचा. त्याचे आदेश डावलण्याची कुणाचीच शामत नसायची. आम्ही प्रत्येकजण भीतभीत चड्डी आवळण्यासाठी चड्डीवर घट्ट बांधलेल्या करगुटय़ाचा एकेक पदर तोडून लांबूनच नवनाथकडे भिरकावत असू. मग करगुटय़ाची मधोमध सैल गाठ करुन मोठय़ा शिताफीने तो इंग़ळीची नांग़ी आवळायचा. ही इंग़ळी म्हणजे विंचवाच्या मानाने दुप्पट-तिप्पट आकाराची असे. तिचं ते अक्राळ विक़्राळ रुप, भली मोठी टचटचीत नांग़ी पाहून आमची शिट्टी पिट्टी गुल होत असे. सहजच तोंडातून 'ये बाबोऽऽ!' असे उद्ग़ार बाहेर पडत.

स्मरण यात्रा

स्म

र

ण

या

त्रा

*एका इंग़ळीला दोरा बांधून मग़ ती दुसऱ्या बिळात तो सोडी. बांधलेली इंग़ळी बिळातल्या इंग़ळीला बरोबर बाहेर खेचून काढीत असे. पुन्हा बाहेर आलेल्या इंगळीची नांगी बांधण्याचा क़ार्यक्रम होई. मग त्यांची झुंज लावण्यात येई. एकमेकींना नांग्या मारुन त्या बेजार करुन टाकत. इंगळ्यांचा हा खरातर जीवघेणा खेळ! बालवयात थोडी चूक झाली असती तरी ज़ीवावर बेतण्याचं काम.*

*मात्र ती जीवाची बाजी स्वतः लावून आम्हाला वेगळं काहीतरी करुन दाखवणारा नवनाथ मात्र वेग़ळाच! त्याचं हे वेडं एकदा इतक़ं चेक़ाळलं की महाशय एका वारुळालाच 'इंग़ळी का पिंगळी' चा मंत्र म्हणायला लागले, अन् फुत्क़ारत सापच बाहेर आला. आमची सर्वांची पळता भूई थोडी!*

*असे अनेक प्रसंग़ नवरात्रात घडलेले. दसऱ्याच्या दिवशी या सग़ळ्या खेळांना पूर्णविराम मिळे. संध्याकाळी नीटनेटके कपडे घालून, डोक्यात टोप्या घालून, टोपीत घटाभोवतीच्या धनाचे तुरे खोवून आम्ही शिलंगणाला निघत. वडज़ाईला धन, आपटय़ाचं सोनं वाहून ग़ावातला एकही उंबरा न सोडता घरोघर शिलंगणाचं सोनं वाटीत फिरत असू. प्रत्येक वडीलधाऱ्यांच्या पावलावर डोकं टेकण्यातला आनंद नवरात्रातल्या त्या खेळांपेक्षा कितीतरी पटीने अधिक असे!*

# संस्कारयात्रा

मराठी एक सुंदर भाषा आहे. अमृतासारखी गोड.  वेरूळसारखी अ-जरा-मर. कधी जुनी होणार नाही. कधी संपणार नाही अशी. आणि महाराष्ट्राच्या काळ्या मातीसारखी सुपीक. या भाषेने आजवर अनेक संत कवी लेखकांना जन्म दिला. आणि जीवनाची सूत्रं सांगण्याची ऊर्मी दिली.

अशा या सुंदर भाषेत आता आम्ही  ई साहित्याचे हे रोपटे लावले आहे. गांवोगांच्या लेखकांनी लिहावे. जगभरातल्या मायबोलीच्या प्रेमिकांनी ते वाचावे. न देणे. न घेणे. फ़क्त विचारधन आणि भावनांचे सौंदर्य लुटायला या.  आनंद घ्या आणि आपल्या प्रतिक्रिया लेखकाला कळवून त्याला एक वेगळाच आनंद द्या.

पण हा आनंद एकटे एकटे घेण्यात मजा नाही भिडू! आपण जे वाचतो त्याचे सुख इतरांना शेअर करण्यात मजा आहे.  आपण वाचलेली पुस्तकं इतरांना फ़ॉरवर्ड करा. त्यावर चर्चा करा. गप्पा मारा. या गप्पांत इतरांना सामिल करा. त्यांनाही वाचनाची गोडी लागू द्या ना.

असं होता होता ई साहित्याचा हा वेल गगनाला भिडेल. त्याचा मांडव सर्वांना सुखशांतीची आणि नवविचारांची सावली देईल. या मांडवाला तुम्हा सर्वांचा हातभार लागलेला असेल.

मैत्रहो.. तुम्ही येवढंच करायचंय. तुमच्या  मित्र परिवाराचे ई मेल आय डी आमच्याकडे पाठवायचे. esahity@gmail.com या पत्त्यावर.

त्यांना आम्ही उत्तमोत्तम साहित्य पाठवू. कसल्याही प्रकारे गैरवापर होणार नाही याची हमी आमची.

लिहा बरं का पत्र!